# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र. ३४५/२०२३ दिनांक ०७/१०/२०२३

**“अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडून जि.वलसाड राज्य-गुजरात येथुन वलसाड शहर पोलीस ठाणे हद्दीतुन ‘कोडेन फॉस्फेट’ हा अंमली पदार्थ मिश्रीत कफ सिरप बाटल्या व Alprazolam Tablets I.P. 1.0 mg नावाच्या टॅबलेट व्यावसायीक प्रमाणात जवळ बाळगणाऱ्या ईसमावर कारवाई.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडे तपासकामी असलेला काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. II ६५७/२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२, २२(क), २९ प्रमाणे मधील अटक आरोपी यांचे कब्ज्यातुन दि.१८.०९.२०२३ रोजी ‘कोडेन फॉस्फेट’ हा अंमली पदार्थ मिश्रीत कफ सिरपच्या १,५०,०००/-रु.किंमतीच्या ३०० बाटल्या व Alprazolam Tablets I.P. 1.0 mg नावाच्या २,१६,०००/-रु.किंमतीच्या १०,८०० टॅबलेटस् असा एकुण ३,६६,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्या असुन तो पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला होता. नमुद आरोपीच्या कब्ज्यात मिळुन आलेला मुद्देमाल हा सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी रा.वलसाड शहर ता.जि. वलसाड राज्य-गुजरात याचेकडुन घेतलेला असल्याचे तपासात निष्पण झाले होते.

त्या अनुषंगाने पो.उप निरी. संतोष घाडगे व पोलीस पथक असे वरिष्ठांच्या परवानगीने वलसाड शहर ता.जि. वलसाड राज्य-गुजरात परिसरात दि. ०६.१०.२०२३ रोजी रवाना झाले होते. पाहिजे आरोपीचे मोबाईलचे टॉवर लोकेशन काढुन तांत्रीक विश्लेषण करुन त्याचे लोकेशन हे सेठीयानगर, कैलास रोड, वलसाड शहर, या ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे कब्ज्यातुन शॉप नं.०२, शिवदर्शन बिल्डींग, सेठीयानगर, कैलास रोड, वलसाड शहर या गाळयामधुन पंचांसमक्ष‘कोडेन फॉस्फेट’हा अंमली पदार्थ मिश्रीत कफ सिरपच्या ४,८४,०००/-रु.किंमतीच्या ९६९ बाटल्या व Alprazolam Tablets I.P. 1.0 mg नावाच्या ३८,६००/-रु.किंमतीच्या १९३० टॅबलेटस् असा एकुण ५,२२,६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्या असुन तो पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथकामार्फत चालु आहे.

सदरची कारवाई मा.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोनि.अमर मराठे, पोउपनि. संतोष घाडगे, पोहवा. ०५०१०/टक्के, पोहवा.०३०७५/कुडवे, पोहवा.०६०४४/सपकाळ, स.फौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर सेल यांनी केली आहे.

-----ooooo------

